## ‘SAKSHAM’ DISTRICT LEVEL CONFERENCE 2023

**SAKSHAM** is the National Level Organisation established for strengthening Divyangjan by providing information regarding different Union and State Government schemes and assisting in different ways by providing assistive aids. For achieving these objectives the District Level Assembly was organised on 22nd Jan, 2023. 425 Divyangjan participated in this Programme.

लोकमत

# उदगीरात आज दिव्यांगांचे लातूर जिल्हास्तरीय सक्षम अधिवेशन

**सक्षम समदृष्टी क्षमता विकास एवं अनुसंधान मंडळ हे सर्व प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणारे एकमेव राष्ट्रीय संघटन आहे. दिव्यांग व्यक्तींचे कौटुंबिक, शैक्षणिक, आरोग्य, इत्यादी प्रकारचे पुनर्वसन करणे तथा त्यांना समाजामध्ये आत्मसन्मानाने आणि स्वावलंबी जीवन जगण्यासाठी व राष्ट्राच्या पुनर्निर्माणामध्ये सक्रिय योगदान देण्यासाठी प्रवृत्त करणे आणि तसेच दिव्यांगांच्या मनातील न्यूनगंड दूर करून त्यांच्यासह संबंधित कुटुंबाला आनंदी जीवन जगण्यासाठी प्रेरित करणे या उद्देशाने काम करणारी सक्षम संस्था आहे.**

उदगीर (ता.प्र.) सक्षम भारत, समर्थ भारत या संकल्पनेनुसार सर्व प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींसाठी-एक पाऊल दिव्यत्वाकडे या हेतूने दर तीन वर्षांनी घेण्यात येणारे लातूर जिल्हास्तरीय सक्षम अधिवेशन स्वामी विवेकानंद वसतिगृह, जळकोट रोड, उदगीर येथे आज रविवार दि. २२ जानेवारी २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेले आहे.

अधिवेशनाचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांच्या हस्ते संपन्न होणार असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून सक्षम राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य सुरेशदादा पाटील उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भा.शि.प्र.संस्था, अंबाजोगाईचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य शंकरप्पा लासूने राहणार आहेत. उद्घाटन कार्यक्रमप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून पोलीस उपअधीक्षक डॅनियल जॉन बेन, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, वैद्यकीय अधिक्षक डॉ. दत्तात्रय पवार, गटविकास अधिकारी महेश सुळे उपस्थित राहणार आहेत. अधिवेशनाच्या समारोप प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून अप्पर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे असुन प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार रामेश्वर गोरे तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील तथा शहर पोलीस निरीक्षक गोरख दिवे,ग्रामीण पोलीस निरीक्षक दीपक वाघमारे आणि अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक शशिकांत देशपांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

लातूर जिल्ह्यातील सर्व दिव्यांग व्यक्तींनी व त्यांच्या पालकांनी अधिवेशनात सहभाग नोंदवावा असे आवाहन सक्षमचे जिल्हाध्यक्ष डॉ. शिवाजी काळगे, जिल्हा सचिव दीपक क्षीरसागर, उदगीर सक्षम अधिवेशन समिती संयोजक डॉ. कालिदास बिरादार, सहसंयोजक सतीश केंद्रे, सतीश पाटील, डॉ.संजय कुलकर्णी, बसवराज पैके, डॉ. संजय तेलंग, हरिश्चंद्र सुडे, डॉ. बाळासाहेब चव्हाण, प्रशांत मांगुळकर, किरण सनगले, पद्माकर तोगरे, रविकिरण मेळकुंदे, विशाल जैन, बसवराज निलंगे आदींनी केले आहे.

सक्षम भारत समर्थ भारत

# समदृष्टी, क्षमता विकास एवं अनुसंधान मंडल,

## ( दिव्यांगों के सशक्तिकरण हेतु समर्पित राष्ट्रीय संघटन)

# "सक्षम" लातूर जिल्हा अधिवेशन

स.न.वि.वि.

सक्षम ( समदृष्टी, क्षमता विकास एवं अनुसंधान मंडल, लातूर जिल्हा ) [ही एक सर्व प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणारे एकमेव राष्ट्रीय संघटन आहे. हे संघटन सर्व प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींचे सामाजीक, शैक्षणिक, आरोग्य व पुनर्वसनासाठी कार्य करते.] या संघटनेचे जिल्हा अधिवेशन रविवार दि. 22 जानेवारी 2023 या रोजी सकाळी 10:00 वाजता आयोजित करण्यात आले आहे.

### उद्घाटन कार्यक्रम

अध्यक्ष
**मा.श्री. शंकरअप्पा लासुने**
मा. सदस्य केंद्रीय कार्यकारी समिती
भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबेजोगाई

प्रमुख मार्गदर्शक
**मा. श्री सुरेश दादा पाटील**
सक्षम. राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य

उद्घाटक
**मा. श्री प्रवीण मेंगशेट्टी**
उपविभागीय अधिकारी, उदगीर

### प्रमुख उपस्थिती

**मा. श्री डॅनियल जॉन बेन**
पोलीस उपाधीक्षक, उदगीर

**मा.श्री.संतोषकुमार नाईकवाडी**
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद लातूर

**मा. डॉ. दत्तात्रय पवार**
वैद्यकीय अधीक्षक, सामान्य रुग्णालय, उदगीर

**मा. श्री महेश सुळे**
गटविकास अधिकारी, उदगीर

### समारोप कार्यक्रम

अध्यक्ष
**डॉ. मा. श्री दत्तात्रय पाटील**
प्राचार्य, धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, उदगीर

प्रमुख मार्गदर्शक
**मा. श्री अरविंद लोखंडे**
अप्पर जिल्हाधिकारी, लातूर

प्रमुख अतिथी
**मा. श्री रामेश्वर गोरे**
तहसीलदार, उदगीर

### प्रमुख उपस्थिती

**मा. श्री गोरख दिवे**
पोलीस निरीक्षक, शहर पोलीस स्टेशन, उदगीर

**मा. श्री दीपक वाघमारे**
पोलीस निरीक्षक ग्रामीण पोलीस स्टेशन, उदगीर

**डॉ. मा. श्री शशिकांत देशपांडे**
अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, उदगीर

**तरी, या कार्यक्रमास आपण वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.**

**आपले विनीत**

डॉ. श्री. शिवाजी काळगे
सक्षम, जिल्हा अध्यक्ष

श्री. हरिश्चंद्र सुडे
सक्षम, जिल्हा उपाध्यक्ष

प्रा. डॉ.श्री. बाळासाहेब चव्हाण
सक्षम, जिल्हा उपाध्यक्ष

श्री. दीपक क्षिरसागर
सक्षम, जिल्हा सचिव

**अधिवेशन स्थळ : स्वामी विवेकानंद वसतिगृह, जळकोट रोड, उदगीर**

**संपर्क : श्री. पद्माकर तोगरे : 9119521510, श्री. बस्वराज पैके : 9075306299**



Chronic Neurological Disorders
दीर्घकालीन मेंदूशी निगडीत स्थिती



Blindness
दृष्टीबाधित



Cerebral Palsy
मेंदूचा पक्षाघात



Locomotor Disability
अस्थिव्यंग



Hearing Impairment
श्रवण बाधित



Multiple Disability
बहुविकलांगता

# अधिवेशन वेळापत्रक

| | |
|---|---|
| ०९:३० ते १०:३० | नोंदणी व चहापान |
| १०:३० ते ११:३० | सत्र १ ले - उद्घाटन |
| ११:३० ते ०१:०० | सत्र २ रे – शासकीय योजनांची माहिती व चर्चा सत्र |
| ०१:०० ते ०२:०० | भोजन |
| ०२:०० ते ०३:०० | सांस्कृतिक कार्यक्रम |
| ०३:०० ते ०४:०० | सत्र ३ रे – समारोप |
| ०४:०० ते ०४:३० | चहापान |
| ०४:३० | शोभायात्रा |

मार्ग : अधिवेशन स्थान

कॅप्टन चौक

छत्रपती शिवाजी महाराज चौक



Sickle Cell Disease
सिकल सेल रोग



Thalassemia
थॅलेसिमीया



Hemophilia
हेमोफिलीया



Parkinson's Disease
पार्किन्सनस रोग



Multiple Sclerosis
एकाधिक स्केलेरोसीस



Autism Spectrum Disorder
स्वमग्नता



Low Vision
अल्पदृष्टी



Mental Illness
मानसिक रोग



Leprosy Cured
कुष्ट रोग मुक्त



Speech Impairment
वाक्‌दोष



Intellectual Disability
बौद्धिक दिव्यांगता



Specific Learning Disability
विशिष्ठ शिक्षण अक्षमता



Muscular Dystrophy
स्नायूंची विकृती



Acid Attack Victim
तेजाब आक्रमण पिडीत



Dwarfism
बौनेपणा

दैनिक राजधर्म

- epaper.rajdharma.in
- वर्ष ४३ वे
- अंक १
- किंमत : रू.२
- पृष्ठे :६
- लातूर
- गुरूवार, दि.२६ जानेवारी २०२३
- RNI NO : 39513/81

### कसबा पेठ आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणूक सुधारित कार्यक्रमानुसार २६ फेब्रुवारी रोजी मतदान

**मुंबई,प्रतिनिधी:**भारत निवडणूक आयोगाने २१५- कसबा पेठ व २०५ - चिंचवड (जि. पुणे) येथील पोटनिवडणुकीचा कार्यक्रम १८ जानेवारी, २०२३ रोजी प्रसिद्ध केला होता. यासंदर्भात आता सुधारित प्रसिद्धीपत्रक जाहीर केले असून, या निवडणूकीसाठी मतदान, रविवार, दिनांक २६ फेब्रुवारी रोजी होणार असल्याची माहिती सामान्य प्रशासन विभागाने दिली आहे.सुधारित कार्यक्रमानुसार मंगळवारी, ३१ जानेवारी २०२३ रोजी अधिसूचना प्रसिद्ध होईल. मंगळवार ७ फेब्रुवारी २०२३ उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिवस असेल. प्राप्त उमेदवारी अर्जांची बुधवार ८ फेब्रुवारी २०२३ रोजी छाननी होईल.

# दिव्यांगांच्या सक्षमीकरणामध्ये शासकीय यंत्रणांसोबतच स्वयंसेवी संस्थांचे मोलाचे योगदान:सुरेश दादा पाटील



**उदगीर,(प्रतिनिधी):**येथे रविवारी दिव्यांगांच्या सशक्तीकरणासाठी सक्षमचे जिल्हास्तरीय अधिवेशन स्वामी विवेकानंद वसतिगृहाच्या मैदानात संपन्न झाले. त्याप्रसंगी बोलताना प्रमुख मार्गदर्शक सक्षम चे राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य सुरेश दादा पाटील यांनी उपरोक्त उद्गार काढले.या अधिवेशनात ४२५ दिव्यांगजन व त्यांचे पालक सहभागी झाले होते.

अधिवेशनाचे उदघाटन तहसीलदार रामेश्वर गोरे यांच्या हस्ते झाले.अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यकारिणी सदस्य शंकरराव लासूणे होते.याप्रसंगी व्यासपीठावर जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी,वैद्यकीय अधीक्षक डॉ.दत्तात्रय पवार,नायब तहसीलदार संतोष गुट्टे व डॉ बाळासाहेब चव्हाण उपस्थित होते.पुढे बोलताना सुरेश दादा पाटील म्हणाली की दिव्यांग व्यक्तींनी व त्यांच्या कुटुंबीयांना शारीरिक,मानसिक सामाजिक दृष्ट्या सर्वार्थाने सक्षम होण्यासाठी नागरिकांची सहानुभूती नसून सहकार्य आवश्यक आहे.जेणेकरून समर्थ भारताच्या निर्माण मध्ये दिव्यांगांचे महत्त्वपूर्ण व उल्लेखनीय योगदान होवू शकेल. दिवसभर चाललेल्या या अधिवेशनात दिव्यांगांना विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले तथा दिव्यांग विद्यार्थी-व्यक्ती यांनी विविध सांस्कृतिक कला सादर केल्या.तसेच चर्चासत्रातून दिव्यांगांसाठी असणाऱ्या विविध शासकीय योजना व सोईसवलतीविषयी माहिती देण्यात आली.अधिवेशन परिसरात दिव्यांगांनी तयार केलेल्या वस्तूचे स्टॉल,स्वप्नील तेलंग यांनी साकारलेल्या चित्रांची प्रदर्शनी,श्रवणबाधितांसाठी माहिती प्रदर्शनी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.धन्वंतरी मेडिकल मेडिकल कॉलेज अँड चॅरिटेबल हॉस्पिटल,उदगीर च्या वतीने सर्व दिव्यांगांचे मोफत प्रकृती परीक्षण करून चवनप्राश वाटप करण्यात आले.सक्षम अधिवेशनाच्या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दत्तात्रय वि.पाटील हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून सुरेश दादा पाटील,उदगीरचे अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.शशिकांत देशपांडे,सक्षमचे जिल्हाध्यक्ष डॉ.शिवाजीराव काळगे,लाल बहादूर संकुलाचे स्थानिक अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी अनेक मान्यवरांची समायोजित मार्गदर्शनपर,उद्बोधनपर व समुपदेशनपर भाषणे झाली.अधिवेशनाच्या विविध सत्रांच्या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन व आभार श्रीपाद सिमंतकर,विशाल जैन,डॉ.कालिदास बिरादार,डॉ वैभव बिरादार व अनिता येलमटे यांनी केले.अधिवेशनाची सांगता दिव्यांगांच्या रॅलीने झाली.स्वामी विवेकानंद वसतिगृह,कॅप्टन कृष्णकांत चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक अशा मार्गाने निघालेल्या रॅलीमध्ये सर्व दिव्यांगांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदविला.अधिवेशनाच्या यशस्वितेसाठी डॉ.संजय कुलकर्णी,डॉ संजय तेलंग,प्रशांत मांगुळकर,सतीश केंद्रे,हरिश्चंद्र सुडे,भगवान देशमुख,श्रीराम शिंदे,बस्वराज पैके, दीपक क्षिरसागर,शाम शेटे,विनोद तेलंग,रवीकिरण बालकुंदे,पद्माकर तोगरे,रामेश्वर मल्लशेटे,डॉ.वैभव बिरादार,डॉ.अस्मिता भद्रे यांच्यासह धन्वंतरी आयुर्वेद कॉलेज चे डॉक्टर्स आंतरवासियता प्रशिक्षणार्थी-विद्यार्थी तथा लालबहादूर शास्त्री विद्यालय व रामकृष्ण इंटरनॅशनल पब्लिक स्कूल येथील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून तहसील कार्यालयाच्या वतीने जनजागृती अभियान अंतर्गत दिव्यांगांना मतदार नोंदणीसाठी माहिती दिली.तसेच सात नव दिव्यांगांची मतदार यादीत नोंदणी करण्यात आली.

# 'सक्षम'च्या अधिवेशनात ४२५ दिव्यांगांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**उदगीर (जि.लातूर) :** दिव्यांगांच्या सशक्तीकरणासाठी 'सक्षम'चे जिल्हास्तरीय अधिवेशन स्वामी विवेकानंद वसतिगृहाच्या मैदानात झाले. या अधिवेशनात ४२५ दिव्यांगजन व त्यांचे पालक सहभागी झाले होते. यावेळी शासकीय योजनांवर चर्चा करण्यात आली.

दिव्यांगांना शासकीय योजनाविषयक मार्गदर्शन करण्यासाठी महसूल विभाग, समाज कल्याण विभाग व वैद्यकीय विभागाचे अधिकारी उपस्थित होते. अधिवेशनाचे उद्घाटन तहसीलदार रामेश्वर गोरे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यकारिणी सदस्य, शंकरराव लासुणे होते. तर व्यासपीठावर सक्षम राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य सुरेश पाटील, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. दत्तात्रय पवार, नायब तहसीलदार संतोष गुट्टे व डॉ. बाळासाहेब चव्हाण उपस्थित होते. अधिवेशन परिसरात दिव्यांगांनी तयार केलेल्या वस्तूंचे स्टॉल, स्वप्नील तेलंग यांनी साकारलेल्या चित्रांचे प्रदर्शन, श्रवणबाधितांसाठी माहिती प्रदर्शन उपलब्ध करून देण्यात आले होते.

समारोपासाठी प्रमुख अतिथी म्हणून उदगीरचे अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शशिकांत देशपांडे, सक्षमचे जिल्हाध्यक्ष डॉ. शिवाजी काळगे, लाल बहादूर संकुलाचे स्थानिक अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, डॉ. दत्ता पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

अधिवेशनाची सांगता दिव्यांगांच्या रॅलीने झाली. अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी डॉ. संजय कुलकर्णी, डॉ. संजय तेलंग, प्रशांत मांगुळकर, सतीश केंद्रे , हरिश्चंद्र सुडे, भगवान देशमुख, श्रीराम शिंदे, बस्वराज पैके, दीपक क्षीरसागर, शाम शेटे, विनोद तेलंग, रवीकिरण बालकुंदे, पद्माकर तोगरे, रामेश्वर मल्लशेटे आदींनी पुढाकार घेतला. मतदार दिनाचे औचित्य साधून तहसील कार्यालयाच्या वतीने दिव्यांगांना मतदार नोंदणीसाठी माहिती देण्यात आली.


सक्षम भारत
समदृष्टि,क्षमता विकास एवं अनुसंधान मंडल,
(दिव्यांगोके लिए सशक्तिकरण हेतु समर्पित राष्ट्रीय संघटना)
सक्षम लातूर जिल्हा अधिवेशन
एक पाऊल दिव्यत्वाकडे.....
रविवार दि.२२ जानेवारी २०२३
: उद्घाटन :
: अध्यक्ष :
: प्रमुख मार्गदर्शक :
: उद्घाटक :




निलंगे – उदगीर
जिल्हा अधिवेशन

